मराठी

# : ईशावास्य :

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

# मराठी

## - ईशावास्य -

जन्म माझा मृत्यु माझा ।
देवा व्यर्थ न जाउं दे ।।
ऐसी वाट मला दावी ।
चुके तों हात तूंच दे ।। १ ।।

तें पूर्ण आणि हें पूर्ण ।
पूर्ण पूर्णांतुनी सरे ।।
पूर्णाचें पूर्ण घेवोनी ।
बाकी पूर्णच कीं उरे ।। २ ।।

मंत्र :– जगीं जें थोडकें छोटें ।
त्या सर्वांस असे धनी
तयें तें टाकितां सेवी ।
कुणाचीही न घे कणी ।। ३ ।।

येथ कार्य करू जाता ।
जगावें वरुषें शत ।।
हें तुला, याविना नाहीं ।
ना नरा कर्म दंशत ।। ४ ।।

राक्षसांचीच तीं ठाणीं ।
अंधारें व्यापिलींत जीं ।।
तीं प्रेतें (!) जाति तेथेंच ।
जे स्वयंघातकी अजी ।। ५ ।।

वेगी एक मनाहूनी ।
शाश्वत देवांस नावरे ।।
आधिचा वाटचाली तो ।
दुज्या धाव्यापुढें सरे ।।
आणि त्याचेच आधारें ।
ओलावा वायुही धरे ।। ६ ।।

तो हाले, तोच ना हाले ।
दूर तो, जवळीहि तो ॥
या साऱ्याच्या अंतरीं तो ।
हें सारें तोच रंगतो ॥ ७ ॥

जो सर्व वस्तुजातांला ।
आपुल्या ठायिं पाहतो ॥
आपणा अन् सर्वभूतीं ।
तेथुनी डळमळें न तो ॥ ८ ॥

सर्व भूतें जये ठायीं ।
होई आत्मा बुधास त्या ॥
कोणता मोह वा शोक ? ।
तेथें अद्वैत पाहत्या ॥ ९ ॥

जणो देह नाहीं असा दिव्य चाले ।
सदा शुद्ध कीं पाप ना त्या विटाळे ॥

शहाणा, विचारी सभोंता स्वतांच्या ।
हिता वस्तुतां शाश्वता ये जनाच्या ॥१०॥

जातात गाढ अंधारीं ।
अविद्या सेवितात जे ॥
रिकामे जाड विद्येचे ।
अंधारी नांदती दुजे ॥ ११ ॥

बोलले एक विद्येचे ।
अविद्येचे तसे दुजे ॥
ऐकिलें हे शाहण्यांचें ।
आम्हांला शिकवीत जे ॥ १२ ॥

अविद्या कोणती विद्या ।
दोन्ही ओळखितो सवें ॥
अविद्ये मृत्यु ओलांडे ।
विद्ये अमरता लवे ॥ १३ ॥

जातात गाढ अंधारीं ।
 जे कांहीं न उभारिती ॥
अतिरेकी उभारांचे ।
 गाढ अंधारि पोंचती ॥ १४ ॥

कुण्या उत्पादनें बोल ।
 खटाटोपें फुक्या कुणा ॥
त्या त्याचें ऐकिलें ऐसें ।
 आम्हां जो होय शाहणा ॥ १५ ॥

बांधणी अन् पाडणीही ।
 दोन्ही ओळखितां सवें ॥
पाडुनी मरण ओलांडे ।
 बांधुनी अमृतास ये ॥ १६ ॥

सोनेरी झांकिलें पात्रें ।
 सत्याच्याहि मुखाप्रती ॥

मोकळें तें करी सूर्या ।
सत्य धर्म पडो दिठी ॥ १७ ॥

पोषका, श्रेष्ठ चालीच्या ।
नियंत्या, वत्सला, रवे ॥
लाविजे रश्मि तैं त्यांचे ।
तेज एकत्र संभवे ॥
तें तुझें रूप देखाया ।
एक मंगल तें हवें ॥ १८ ॥

जो तो पुरुष सूर्यांत ।
तो तोच पण मी असें ॥
अमर तें अंगिचें वारें ।
अंग हें अंति भस्मसें ॥ १९ ॥

बीजमंत्रः– आठव यज्ञैक देवा रे ।
केल्याचा करि आठव ॥ २० ॥

**प्रार्थना मंत्र :–**

अग्ने लावी नीट वाटेस आम्हां ।
ज्ञानें सारीं आमुचीं ज्ञानधामा ॥
सारीं सारीं किल्मिषें आमुचीं रे ।
वन्दू, वन्दू, वन्दु सर्व प्रकारें ॥ २१ ॥

★

# श्री. पु. पां. गोखले यांची पुस्तकें.

| | | रु. पैसे |
|---|---|---|
| अठराशे सत्तावनचा महाराष्ट्र (दुसरी आवृत्ति) | | १–५० |
| अठराश्लोकी गीता (सहावी आवृत्ति) | ... | ०–३० |
| (मराठी, हिंदी, संस्कृत, गुजराथी, इंग्रजी) | | |
| असे आपले आगरकर | ... | ०–६० |
| आगरकर–चरित्र (चवथी आवृत्ति) | ... | |
| आगरकरांशी ओळख (पैलुदार अभ्यास) | ... | |
| ईशावास्य (मराठी चवथी आवृत्ति) | ... | ०–१५ |
| एकाध्यायी गीता | ... | |
| (मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी) | | |
| काँग्रेस पक्ष | ... | ३–०० |
| गीताधर्म–प्रवेश (गीतेचा सूक्ष्म अभ्यास) | ... | |
| गोखले–गांधी | ... | ०–२५ |
| गोखल्यांच्या गोष्टी | ... | ०–६० |
| जागृत सातारा (सातारा जिल्ह्याचा इतिहास १९६६ पर्यंतचा; दुसरी आवृत्ति) | ... | १०–०० |
| दिलके बोल (हिंदीतून पत्रव्यवहार) | ... | |
| परिचित सातारा | ... | |
| (सातारा जिल्ह्याची सामाजिक, आर्थिक पहाणी) | | |

| | | |
|---|---|---|
| बाबा राघवदास (हिंदी महंत–चरित्र) | ... | २–५० |
| बोल–बाला (निवडक व्याख्याने) | ... | |
| भगिनी निवेदिता | ... | ०–८० |
| भारतभाव (स्वातंत्र्यासंबंधी भारतीयांची जबाबदारी) | ... | |
| भारतसेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले | ... | १०–०० |
| मुंजा मुलास | ... | ०–०६ |
| राष्ट्रभाषामे आगरकर | ... | |
| ललित लहरी | ... | |
| लोकप्रिय भाऊसाहेब सोमण | ... | |
| वेद–व्यास पं. सातवळेकर | ... | १२–०० |
| शुभमंगल सावधान | ... | |
| समर्थ संप्रदाय | ... | |
| समर्थांचा विशद भक्तिमार्ग | ... | |
| सहकार–संपदा | ... | ०–६३ |
| सातारा जिल्हयाची कालवाचक क्रियापदे | ... | |
| साहित्यिक कऱ्हाड | ... | ०–५० |
| हे पहा पंडितजी ! | ... | ०–७५ |

*

प्रकाशक:—

सौ. सुलोचना गोखले,
४३६ सोमवार, कराड.

मुद्रक:—

वि. रा. नावडीकर,
श्रीदत्त प्रेस, कराड.